This question paper consists of 37 questions and 7 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 7 छापील पाने आहेत.

| Roll No. अनुक्रमांक | | | | | | | | | | | | | Code No. 42/S/A/M कोड नं. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

# मराठी
# MARATHI
# (204)

**Day and Date of Examination**
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ______________________

**Signature of Invigilators** 1. ______________________
(निरीक्षकाची सही)
2. ______________________

---

**सामान्य अनुदेश :**

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की प्रश्नपत्रिकेतील एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायातून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकामधे योग्य उत्तर लिहावयाचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यात येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **42/S/A/M** लिहावा.

# MARATHI

## (मराठी)

## (204)

वेळ : तीन तास | एकूण गुण : 100

**निर्देश :**

1 सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2 सर्व प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहावीत.

3 प्रश्न 1 ते 11 पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

**1** लेखकाच्या एकलकोंडी आयुष्यांत झेल्या त्यांचा कोण झाला ? **1**

(A) साथीदार (B) सोबती

(C) सखा (D) मित्र

**2** पुढे दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय ओळखा. **1**

(A) परीस्थिती (B) परिस्थीति

(C) परीस्थिति (D) परिस्थिती

**3** खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून भरा. **1**

'प्रिय ........... गाऊ.'

(A) मंगलगीते (B) निसर्गगीते

(C) बालगीते (D) भारतगीते

**4** पुढीलपैकी कुठल्या वाक्यांत सर्वनाम आले आहे ? **1**

(A) श्याम उद्या येईल (B) राघव हुशार आहे

(C) मी पुस्तक वाचले (D) गायत्री सुंदर दिसते

**5** देशांत सगळयांत मोठे धन कोणते आहे ? **1**

(A) पैसा (B) शस्त्रात्र

(C) मुले (D) प्रदेश

6 लग्नापूर्वी नागू गवळयाचा जास्त वेळ पुढील कोणत्या गोष्टीत जायचा ? 1

(A) दूध घालणे

(B) पैलवानी करणे

(C) झोप घेणे

(D) यापैकी काही नाही

7 प्रत्येक जण पिल्लाशी कसा बोलत असे ? 1

(A) टोचून

(B) रागावून

(C) धिक्कारून

(D) लाडीगोडीने

8 योग्य पर्याय भरून वाक्य पूर्ण करा – 1

'..........शपथ घालितो तुजला'.

(A) गळयाची

(B) नदीची

(C) भूमातेची

(D) तद्विरहाची

9 हिंदुस्थानचा दक्षिण भाग कसा असेल असे लेखकास वाटले होते ? 1

(A) लहान

(B) चिंचोळा

(C) विस्तीर्ण

(D) चिमुकला

10 शेतकरी शेतसारा कां देत नाही ? 1

(A) शेतसारा माफ होणार होता

(B) कारण त्याला शेतसारा बुडवायचा होता

(C) शेतसारा देण्याची इच्छा नव्हती

(D) शेतसारा देण्यासाठी पैसे नव्हते

11 कापणीच्या वेळी शेतांत कोणता विधी श्रद्धापूर्वक केला जातो ? 1

(A) वटपूजा

(B) बोणं

(C) देवीचे अनुष्ठान

(D) कोयत्याची पूजा

12 संभाजी राजांना पत्र कुणी लिहले ? 1

13 सनातनी समाजाच्या दृष्टीने महर्षी कर्वे यांनी कोणते महापातक केले होते ? 1

14 डोंबारी स्त्रियांची तुलना लेखकाने इतिहासातील कोणत्या स्त्री बरोबर केली आहे ? 1

15 सज्जन लोकांचे मन कसे असते ? 1

16 खालील वाक्यांतील क्रियापद ओळखा व त्यांचा काळ कोणता आहे ते सांगा 1

(i) ती आईला मदत करीत होती

(ii) डिझेलची किंमत उद्या वाढेल.

17 हजारो वर्षानंतर कोण कुणास लाभले ? 1

18 मास्तरांनी झेल्याला आपली आठवण म्हणून कोणकोणत्या वस्तू दिल्या ? 1

19 'का चरण केधवा तुम्हास त्याचे दिसले ?' हा प्रश्न कवी कुणास विचारतो ? 1

20 पुढे दिलेल्या शब्द समुहाबदल एक शब्द सूचवा 1

(i) गुप्त बातम्या काढणारा

(ii) घोडे बांधण्याची जागा

21 कवीने मातृभूमीचा निरोप घेतांना तिला कोणते आश्वासन दिले ? 1

22 वि. स. खांडेकर यांचे अपरिग्रहव्रत कोणते ? 1

23 (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन–दोन समानार्थी शब्द लिहा :– 2

(i) पैसा

(ii) भोजन

(ब) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :– 2

(i) कडू (ii) अजाण

(iii) आदर (iv) आशा

**24** खालील उतारा लक्षपूर्वक वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

"गीताधर्मा प्रमाणे नम्र चालून कर्तव्य करणारा आणि मानवी प्राण्याला जेव्हढे समाधान मिळविणे शक्य आहे, तेवढे मिळविणारा असा राष्ट्रपुरूष काय तो एक युधिष्ठिर आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्वर्गाचा त्याच्या ठायी योग्य मिलाप झाला होता.

ऐहिक विजय, ऐहिक सुख, ऐहिक वैभव ही सर्व बाहेरुन आकर्षक आणि आंतून निःसार अशा कवंडाळाच्या फळासारखी असतात, हे समजून तो वागला आहे. 'धर्मो रक्षति रक्षितः' हे त्याचे ब्रीद वाक्य. धर्ममार्गावर युधिष्ठिराची जेवढी श्रद्धा तेवढी कुणाचीच दिसून येत नाही. धर्ममार्ग आपणास कोढेही नेवो, निःशंकपणे तेथे जावयाचे आणि धर्माच्या हाती आपण केव्हाही सुरक्षितच आहोत, अशी श्रद्धा कायम ठेवायची, या वृत्तीने धर्मराजाचे जीवन सर्व बाजूनी सफलच झाले आहे."

**प्रश्न :**

(i) युधिष्ठिराने मानवी जीवनात सुख कसे मिळविले ? **1**

(ii) युधिष्ठिराच्या ठायी कोणत्या चार वर्गाचा मिलाप झाला आहे ? **1**

(iii) कवंडाळाच्या फळासारखे काय आहे ? **1**

(iv) युधिष्ठिराचे ब्रीद वाक्य कोणते ? **1**

**25** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :–

'संताचा अनुभव संतची जाणती । येर ते हासति अभाविक ॥1॥
नामाचा प्रताप प्रल्हादचि जाणे । जन्म मरण येणे खुंटविले ॥2॥
सेवेचा प्रकार जाणे हनुमंत । तेणे सीताकांत सुखी केला ॥3॥
सख्यत्वे पूर्णता अर्जुना बाणली । ऐक्य रूपे चाली मिरविला ॥4॥
चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । तेथे मी पामर काय वानू ॥5॥

प्रश्न :

(i) नामस्मरणाने भक्त प्रल्हादाला काय मिळाले ? **1**

(ii) सामान्य माणसे संताना कां हासतात ? **1**

(iii) संत चोखामेळा यांनी संताच्या श्रेष्ठ आचरणाचे स्वरूप कोणत्या उदाहरणांतून स्पष्ट केले आहे ? **2**

26 खालील प्रश्नांची थोडक्यांत उत्तरे लिहा :–

(i) हेडगेवार यांच्या व्यक्तिमत्वाचे कोणते विशेष लेखकाने सांगितले आहे ? **2**

(ii) राजाची कीर्ति कोणकोणत्या गोष्टींमुळे वाढेल असे समर्थ रामदास सांगतात ? **2**

27 (अ) ज्योतिबांनी शेतकऱ्यांची कोणकोणती दुःखे सांगितली आहेत ? **3**

(ब) 'कन्याकुमारी' या पाठाचे लेखक गंगाधार गाडगीळ यांच्या मनांमधे निर्माण झालेली एकटेपणाची भावना नाहिशी कशी झाली ? **3**

28 (अ) आचार्य विनोबांच्या मते गावाचे गोकुळ केंव्हा होईल ? **2**

(ब) आपल्या झोपेच्या सवयीबदल नागूला कां वाईट वाटे ? **2**

29 (अ) 'श्रावणमास' या कवितेत कवीने स्त्रियांना झालेला आनंद कसा व्यक्त केला आहे ? **3**

(ब) मातृभूमीच्या मातीची महती शांता शेळके कोणत्या पद्धतीने सांगतात ? कवितेचे नांव लिहा. **3**

30 (अ) ग. दि. माडगुळकरांनी मानवी स्वभावाचे कोणते विशेष बदकाच्या उदाहरणांतून सांगितले आहे ? कवितेचे नांव लिहा. **3**

(ब) खालील पंक्तीचा ससंदर्भ अर्थ स्पष्ट करा :– **3**

'जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥1॥
तोचि साधु वोळखावा । देव तेथेचि जाणावा ॥2॥

31 (अ) 'प्रा. श्रीनिवास'यांच्या उपक्रमशीलतेचे वर्णन करा. लेखकाचे नांव लिहा. **3**

(ब) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत, असे टिळकांना वाटते ? **3**

32 तुमच्या गावांतील जत्रा पाहून तुमची भावंडे घरी आली आहेत. त्यांचा तुमच्याशी झालेला संवाद 8 ते 10 वाक्यांत लिहा. **4**

33 खालीलपैकी **एका** विषयावर निबंध लिहा :– (शब्दमर्यादा – 200) 10

(i) माझा आवडता सण

(ii) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

(iii) 'प्रदूषण' – एक समस्या

(iv) 'संगणक' – शाप की वरदान

34 तुम्हाला या पाठ्यपुस्तकांतील सर्वात अधिक कोणता पाठ आवडला ? कां ? त्या पाठाचे व लेखकाचे नांव सांगा. 4

35 तुमचा लहान भाऊ इयत्ता नववीत प्रथम क्रमांकाने पास झाला आहे. त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. 8

**किंवा**

रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबदल पोलीस खात्याकडे एक तक्रार नोंदवा. 8

36 पुढील उताऱ्याचा **एक तृतीयांश** सारांश तुमच्या शब्दांत लिहा : 4

'मनुष्यांच्या आहारवस्तू कष्टसाध्य आहेत. त्यांची उपभोगइच्छा अमर्याद आहे. एवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणे ध्यानांत आल्या म्हणजे त्यास इतर प्राण्यांपेक्षा शेकडोपट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हे सहज समजणार आहे. हे ज्यास पक्के समजून येईल, तो निरूद्योगी होणार नाही. तो उद्योगी होईल. इतकेच नाही तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्याचे सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करुन आयुष्य घालविणे शक्य आहे. पण उद्योगी मनुष्याशी गाठ पडल्यास – त्याच्या प्रमाणे उद्योग करण्यास, किंवा त्याच्या आधीन होऊन तो ठेवील त्या स्थितीत राहण्यास तयार झाले पाहिजे. आमचे भावी स्वातंत्र्य अथवा आमचे निरंतर दास्य, सर्वभैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.'

37 खालील माहितीच्या आधारे वृक्षआलेख तयार करा : 4

धान्याचे दोन प्रकार करतां येतील. एक अन्नधान्ये व दुसरे कडधान्ये. अन्नधान्यांत आपण ज्वारी, बाजरी, गहू व तांदूळ यांची गणना करूं तर कडधान्यांत तूर, उडीद, मठ, वटाणा यांचा समावेश करूं शकतो.